ऑनलाईन साप्ताहिक वाचण्यासाठी
आमचा क्युआर कोड स्कॅन करा.

पोस्ट रजि.नं.-AR/TECH NO RNP-JAL/120/2019-21

साप्ताहिक
गोदावरी
परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

* वर्ष २३ वे * अंक ४८ * सोमवार २८/११/२०२२ * डाक ३०/११/२०२२ * पाने - ६ * किंमत २ रुपये


आई माझा गुरु,
आई कल्पतरू...!
गोदावरी
आई
महोत्सव
(मातृवंदन सोहळा)
- दिनांक -
बुधवार दि. ७ डिसेंबर २०२२
- वेळ -
सायंकाळी ४.०० वा.
- स्थळ -
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय
जळगाव-भुसावळ महामार्ग, जळगाव खुर्द.

आला क्षण आनंदाचा, गोदावरी माऊली भेटीचा!

प्रेमरुपी मायेच्या स्पर्शाने रुग्णांना मिळाला धीर

जळगाव - प्रचंड इच्छाशक्ती व उत्साहाचा वाहणारा निर्मळ झरा म्हणजे गोदावरी आई... गोदावरी परिवाराचा उर्जा स्त्रोत असलेल्या गोदावरी आई ह्या गेल्या दोन महिन्यापासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे घरीच होत्या. सारा परिवार हा एका वेगळ्याच चिंतेत होता. मात्र परिस्थीतीशी दोन हात करीत वयाच्या ८९ व्यावर्षीही इच्छाशक्तीच्या बळावर गोदावरी आई पुन्हा ठणठणीत झाल्या. तज्ञ डॉक्टरांनी केलेल्या उपचाराला मिळालेल्या प्रतिसादाने गोदावरी आईंनी पुन्हा एकदा डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात पाऊल ठेवले आणि आला क्षण आनंदाचा... गोदावरी माऊली भेटीचा.. या कवितेच्या ओळी आपसुकपणे प्रत्येकाच्या ओठांवर आल्या.

गोदावरी परिवाराच्या आधारस्तंभ असलेल्या गोदावरी आई ह्या दोन महिन्यानंतर मंगळवार दि.२२ नोव्हेंबर रोजी डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात आल्यात. रुग्णालयाची पायरी चढताच कर्मचाऱ्यांसह उपचारासाठी आलेल्या रुग्णासह नातेवाईकांच्या चेहर्यावर सुखाचा क्षण दिसून आला. प्रत्येकाने गोदावरी आईंच्या प्रकृतीची विचारपूस केली. गोदावरी आईंनीही प्रत्येकाच्या प्रश्नाला स्मितहास्य करीत प्रतिसाद दिला. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात नांदुरा येथील आरोग्य शिबिरातील रुग्ण उपचारार्थ दाखल झाले होते. याप्रसंगी आयोजक ब्रह्मदत्त घाटे यांच्यासह सर्वांनीच गोदावरी आईंना पाहून नमस्कार करण्यासाठी जणू रिघच लावली होती. समवयस्करांनी हात जोडून आजींना आदररुपी नमस्कार केला आणि निरोगी दिर्घायुष्याच्या तसेच आपल्या मुलाने एवढी मोठ्ठी आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिली, रुग्णांना घेण्यासाठी गाडी पाठविणे हा सेवाभाव हे संस्कार आपल्याकडूनच आले असल्याचे सांगून गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील यांचे देखील यावेळी आभार मानले.

रुग्णांवर फिरला पुन्हा मायेचा हात

डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील बऱ्याचशा विभागांना श्रीमती गोदावरी आईंनी भेट देवून रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या मस्तकावर मायेचा हात फिरवून त्यांना धिर दिला. यावेळी गोदावरी आईंनी रुग्णांकडून सर्व डॉक्टर्स व्यवस्थीत काळजी घेतात का, उपचार करतात का हे देखील विचारले आणि रुग्णाच्या प्रतिक्रियेअंती डॉक्टर्स नर्सिंग स्टाफचेही यावेळी कौतुक केले.

चिमुकलीच्या पोटावरुन गेली बैलगाडी

पेडियाट्रिक सर्जनने कौशल्य वापरीत शस्त्रक्रिया न करताच वाचविले प्राण

जळगाव - अवघ्या दोन वर्षीय चिमुकलीच्या पोटावरुन बैलगाडी गेल्याने पांथरी फाटली आणि अतिरक्तस्त्राव झाला. तातडीने रुग्णालयात दाखल करुन घेत पेडियाट्रिक सर्जन डॉ.मिलींद जोशी यांच्यासह टिमने सर्जरी न करता अचूकरित्या उपचार करुन बालिकेचा जीव धोक्याबाहेर आणला. त्यानंतर बालरोग विभागात सात दिवस उपचार सुरु होते, बालिका अगदी हसत-खेळत तर तिचे पालक आभार मानून समाधानाने घरी गेले. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत बालिकेवर उपचार करण्यात आले.

अधिक माहिती अशी की, दोन वर्षीय चिमुकलीच्या पोटावरुन बैलगाडीचे चाक गेल्याने तिची पांथरी तुटली होती. परिणामी रक्तस्त्राव सुरु झाला. याबाबत डॉक्टर सांगतात की, शरिरात पाच पांथरी अर्थात प्लीहा असतात, ह्या बालिकेच्या पोटावर अतिवजन पडल्याने तिची चार नंबरची प्लीहा फाटून रक्तस्त्राव झाला आणि जिवितास धोका निर्माण झाला होता. घाबरलेल्या अवस्थेत बालिकेला घेवून नातेवाईक रुग्णालयात आले, त्यावेळी शस्त्रक्रिया तज्ञांनी धिर दिला व उपचार सुरु केले.

याप्रसंगी पेडियाट्रिक सर्जन डॉ.मिलींद जोशी यांनी प्रकृती स्टेबल करण्यासाठी मार्गदर्शन केले, तेव्हा तिला आयसीयूमध्ये ठेवण्यात आले. रक्त बरेच गेले असल्याने शरिरातील रक्ताचे प्रमाणही कमी झाले होते. तसेच काही तपासण्याही करण्यात आल्यात, ज्यावरुन रुग्णाच्या जखम किती आहे याचे निदान झाले. प्रकृती स्थिर होताच डॉ.जोशी यांच्यासह निवासी डॉ.श्रीयश सोनवणे यांनी शस्त्रक्रिया न करता मानेतून स्कोप टाकत रिसक्सेशन केले. तसेच रक्तही देण्यात आले. तज्ञांच्या टिमचे कौशल्याने ऑपरेशन यशस्वी झाले. त्यानंतर बालिकेला रुग्णालयातील बालरोग विभागात दाखल करण्यात आले व सातव्या दिवशी डिस्चार्ज देण्यात आला.

बालरोग विभागाद्वारेही उपचार

२ वर्षीय बालिकेची पांथरी ७५ टक्के तुटलेली होती. अतिगंभीर अवस्थेतील या बालिकेची शस्त्रक्रिया न करता उपचार करुन बालरोग कक्षात दाखल करण्यात आले. येथे तिला गॅस्ट्रीकअस्पीरेशन,हेवी एन्टीबॅटीक तसेच २ बॉटल रक्त लावण्यात आले. २४ तास ऑक्सीजन व रक्तदाबावर लक्ष ठेवले गेले. ७ दिवसांनी सोनोग्राफी केल्यानंतर रक्ताच्या गुठळया तयार झालेल्या दिसून आल्यात पण रक्तस्त्राव देखिल थांबलेला होता. पोटाचा घेर देखिल कमी झालेला दिसून आला. सुरूवातीला ठणक असलेले पोट आता मउ पडत होते. यातच शौचाला देखिल जायला लागली होती. १८ दिवसानंतर सदर बालीका ठणठणीत बरी झाल्याची माहिती बालरोग तज्ञ डॉ.उमाकांत अणेकर यांनी दिली. बालरोग विभागातील डॉ.अनंत बेंडाळे, डॉ.सुयोग तन्नीरवार, डॉ.विक्रांत देशमुख, निवासी डॉ.सुरुची शुक्ला, डॉ.प्रज्ञिल रांगणेकर, डॉ.रोहिणी देशमुख, डॉ.दर्शन राठी आदिंचेही सहकार्य लाभले.

गंभीरावस्थेतील रुग्णावर तातडीने क्रेनियोटॉमीद्वारे वाचविले प्राण

अपघातात जखमी रुग्णावर मध्यरात्रीच तज्ञांद्वारे शस्त्रक्रिया

जळगाव - मद्यपानाच्या नशेत असलेल्या ३० वर्षीय इसमाला गाडीने उडविल्यामुळे त्याच्या मेंदूत अतिरक्तस्त्राव होवून जीवास धोकास निर्माण झाला होता. सदर घटना मध्यरात्री दोन वाजेची असून अपघातग्रस्त रुग्णाला दाखल करुन घेत तातडीने भुलरोग तज्ञांच्या सहकार्याने शल्यचिकित्सक तज्ञांनी क्रेनियोटॉमी केली. ऑपरेशननंतर दोन तासानेच रुग्ण शुद्धीवर येवून हालचाल करुन लागला तसेच पाचव्या दिवशी रुग्ण स्वत:च्या पायावर चालत घरी गेला.



सविस्तर वृत्त असे की, तीस वर्षीय इसम मद्यपानाच्या नशेत रस्त्यावरुन जात असतांना गाडीने उडविले. परिणामी मेंदूला मार बसून अतिरक्तस्त्राव झाला आणि रुग्ण बेशुद्ध पडला. मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास डॉ.उल्हास पाटील रुग्णालयाने रुग्णाला तारले. शस्त्रक्रिया विभागातील निवासी डॉ.श्रीयश सोनवणे, डॉ.सेजोल कश्यप यांनी रुग्णाला सीटी स्कॅन करण्यास पाठविले, रुग्णाच्या डाव्या बाजूच्या मेंदूला दुख होवून मेंदू उजव्या बाजूला ९ एमएम सरकला परिणामी इडीएच अर्थात एक्स्ट्रा ड्यूरल हॅमोरेज झाले होते.

महात्मा ज्योतिबा फुले योजनेतून उपचार

यासंदर्भातील माहिती न्यूरोसर्जन डॉ.स्वप्नील पाटील यांना देवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.श्रीयश सोनवणे, डॉ. सेजोल कश्यप यांनी शस्त्रक्रिया केली. भुलतज्ञ डॉ.महाजन, डॉ.शिवाजी, डॉ.हर्षा यांचे सहकार्य यावेळी लाभले. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णावर उपचार करण्यात आले.

शस्त्रक्रियेदरम्यान मेंदूतील कवटी काढून रक्ताच्या गाठी काढण्यात आल्यात तसेच पुन्हा कवटी, मेंदूसहीत जागी ठेवण्यात येवून शस्त्रक्रिया पूर्ण केली. दिड ते दोन तासात ही शस्त्रक्रिया होवून काहीवेळातच रुग्ण शुद्धीवर आला. सकाळी रुग्ण बोलायला लागला, दुसऱ्यादिवशी जेवायला लागला आणि तिसर्या दिवशी तो स्वत:च्या पायावर चालत घरी गेला. हे पिच्चरचे कथानक वाटत असले तरी ही घटना सत्य असून मध्यरात्री तातडीने उपचार करुन रुग्णाचे प्राण वाचविण्याचे श्रेय डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील तज्ञांना जाते.

शिबिरांमधून सशक्त आरोग्याचा संदेश

डॉ. उल्हास पाटील रूग्णायातर्फे मोफत शिबिरांचा लाभ

जळगाव – ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा वसा घेत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातर्फे शिबीरांच्या माध्यमातून सशक्त आरोग्याचा संदेश दिला जात आहे. दरम्यान डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे आयोजित मोफत आरोग्य शिबीराचा ग्रामीण भागातील हजारो रूग्णांना लाभ मिळत आहे. तसेच नागरिकांच्या आग्रहास्तव गाव तेथे शिबीर हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

गेल्या सहा महिन्यापासून खान्देश आणि विदर्भात आरोग्य सेवेचा ध्यास घेवून विविध शिबिर आयोजित करण्यात आले असून या शिबिराच्या माध्यमातून विविध विषयांचे तज्ञ डॉक्टर गावागावात जावून तपासणी करून पुढील उपचाराचा सल्ला देत आहे. सशक्त समाज घडवण्यासाठी बालरोग, स्त्रीरोग, शस्त्रक्रिया, मेडीसिन, अस्थीरोग, हदयरोग तज्ञ शिबिरातून सशक्त आरोग्याचा संदेश देत आहे. आतापर्यंत या आठवडयात डोणगाव, खडकदेवळा, निमखेडी, धानोरा, भंबाडा निंभोरा, यावल, जसौंदा गोजोरे आणि भुसावळात जवळपास या

शिबिरातून १५०० च्या वर नागरिकांनी आरोग्याची तपासणी करून घेतली यातील जवळपास ५०० च्या वर रूग्णांना पुढील उपचारासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. सशक्त आरोग्याचा संदेश देणारे हे आरोग्य शिबिर यापुढेही सतत सूरू राहणार असून गावातील नागरिकांनी तपासणी करून घेण्याचे आवाहन डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयातर्फे करण्यात आले आहे.

डोणगावातील आरोग्य शिबिरात ग्रामस्थांनी व्यक्त केले समाधान

यावल – तालुक्यातील डोणगाव येथे मंगळवार, २२ नोव्हेंबर रोजी गोदावरी फाऊंडेशनतर्फे महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात एकूण ५८ रुग्णांची ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणी करण्यात आली.

उद्घाटनाप्रसंगी सरपंच आशाबाई सुरेश पाटील यांची उपस्थीती होती. शिबिरात डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील निवासी डॉ.कलीम, डॉ.अमेय, डॉ.शिफा, डॉ.आफिया, डॉ.चारु, डॉ.अंकित यांनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी नेत्ररोग ३, मेडिसीन ३, अस्थिरोग ३, स्त्रीरोग १, नाक-कान-घसा ४ अशा १४ रुग्णांना पुढील उपचारा संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. रुग्णांची नोंदणीसाठी नर्सिंग विभागाचे सहकार्य लाभले. शिबिर यशस्वीतेसाठी अमोल पाटील, विकास कोळी, तेजस भालेराव, राहूल पाटील, गोकुळ सोनवणे, खुशाल ठोके यांच्यासह मित्र परिवार डोणगाव आदिंचे सहकार्य लाभले.

खडकदेवळा आरोग्य शिबीर; ८७ रूग्ण तपासणी

पाचोरा – तालुक्यातील खडकदेवळयात २३ नोव्हेंबर रोजी गोदावरी फाऊंडेशनतर्फे महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात ८७ रुग्णांची ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणी करण्यात आली.

शिबिरात डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील निवासी डॉ.कलीम, डॉ.अमेय, डॉ.शिफा, डॉ.आफिया, डॉ.चारु, डॉ.अंकित यांनी रुग्णांची तपासणी केली. ८७ रूग्णांपैकी नेत्ररोग ०६,मेडीसिन ०२,अस्थीरोग ०६, सर्जरी ०१ हदयालय ०२ आणि नाक कान घसा ०३ अशा २१ रूग्णांना पुढील उपचाराबाबत सल्ला देण्यात आला. रुग्णांची नोंदणीसाठी नर्सिंग विभागाचे सहकार्य लाभले.

स्त्रीरोग शिबिरातून महिलांना दिलासा

निमखेडी ता. जळगाव – येथे नुकताच महिलांसाठी आरोग्य शिबिर घेण्यात आले. यातून महिलांना दिलासा मिळाला आहे.

२७ महिलांनी या शिबिरात आरोग्य तपासणी करून घेतली.१८ महिलांची ए एनसी करण्यात आली. तर १६ महिलांची सोनोग्राफी या शिबिरातून करण्यात आली. ५ महिलांना स्त्रीरोग विभागात पुढील उपचारासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले तर २ महिलांना इतर आजार असल्याने उपचाराचा सल्ला देण्यात आला.

भुसावळात शिबिराला प्रचंड प्रतिसाद

भुसावळ – येथे आयोजीत आरोग्य तपासणी शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. भुसावळात ३७५ नागरिकांची तपासणी करण्यात आली.

या ठीकाणी मेडिसिन तज्ञ डॉ दिनेश, डॉ अचल, सर्जरी डॉ. श्रीधर, नेत्ररोग डॉ आशुंतोष, स्त्रीरोग तज्ञ डॉ. महेश देशमुख, नाक कान घसा डॉ. पुथ्वी, अस्थीरोग डॉ. अंकीत यांनी तपासणी केले. ५७ रूग्णांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला. यात मेडिसिन ०२, सर्जरी ०४, नेत्ररोग १७,अस्थीरोग १६, नाक कान घसा ०४ तर हदयालय १४ रूग्ण आहेत.

धानोऱ्यात ४३ रूग्णांना लाभ

चोपडा – तालुक्यातील धानोरा येथे आयोजीत आरोग्य तपासणी शिबिराचा ४३ रूग्णांना लाभ मिळाला.

या ठीकाणी मेडीसिन डॉ.उमेश, सर्जरी डॉ. अमेय लोखंडे, नेत्ररोग डॉ.सलमान या तज्ञांनी तपासणी केली. यातील ११ रूग्णांना पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यात नेत्ररोग ०१, मेडीसिन ०३, अस्थीरोग ०१, सर्जरी ०३, बालरोग ०२, तर त्वचारोग ०१ रूग्णांना पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

भंबाड्यात १२१ नेत्ररूग्ण तपासणी

भंबाडा – भंबाडा येथे मंगळवार, २३ नोव्हेंबर रोजी गोदावरी फाऊंडेशनतर्फे महाआरोग्य नेत्ररोग तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात १२१ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिरात नेत्ररोग तज्ञ डॉ. अंजली मयेकर यांनी रूग्णांची तपासणी केली. १२१ रूग्णांपैकी २८ रूग्णांना मोतिबिंद शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. या रूग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. यावेळी रुग्णांची नोंदणीसाठी नर्सिंग विभागाचे सहकार्य लाभले.

संक्षिप्त

पळासखेडे येथे महारक्तदान शिबीर

जळगाव – पळसखेडा जामनेर येथे श्री. प्रकाशचंद जैन कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च पळासखेडा जामनेर येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्रकाशचंद जैन बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री.राजकुमार कावडीया यांच्या हस्ते झाले सोबत संस्थेचे सचिव मनोजकुमार कावडीया व श्री. प्रकाशचंद जैन कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मयूर भुरट हे होते. संस्थेचे अध्यक्ष श्री.राजकुमार कावडिया यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ३० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. त्यासोबतच महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही रक्तदान केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठ प्राध्यापक ललित जैन, गोदावरी फाउंडेशन डॉक्टर उल्हास पाटील रुग्णालय व रक्तपेढीचे डॉ. नितीन भारंबे ,रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील, अमोल चौधरी, सईद शेख सर, यांनी परिश्रम घेतले.

बेंडाळे महिला महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न

जळगाव – येथील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय आणि डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय पतपेढीतर्फे रक्तदान शिबिर झाले. प्राचार्य डॉ. गौरी राणे यांनी रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले.

प्राध्यापक, शिक्षकेतर सहकारी, विद्यार्थिनी अशा २० दात्यांनी रक्तदान वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. केले. नितीन भारंबे आणि सहकाऱ्यांनी शिबिराचे संयोजन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शीला राजपूत, प्रा. रत्ना महाजन, प्रा. ५ दीपक किनगे, छात्रसेनच्या प्रा. सायली पाटील, प्रा. एच. आर. जाधव, डॉ. सुहास पाटील, उपप्राचार्य सुनीता पाटील, प्रा. अनिल बेलसरे, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका, राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट्स यांनी सहकार्य केले. यावेळी १५० मुलींची रक्तगट तपासणी यशस्वीतेसाठी डॉ. नितीन भारंबे रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील, सय्यद शेख सर, सचिन साळुंखे, अली खान, यांनी परिश्रम घेतले.

जसौंदा शिबिरात नेत्र तपासणी

ब हाणपूर – तालुक्यातील जसौंदा येथे गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातर्फे मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी नेत्ररोग तपासणी शिबिर घेण्यात आले. यात ४० रूग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिरात डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील निवासी डॉ. आशुंतोष गिरबिडे यांनी रुग्णांची तपासणी केली. त्यातील ४ रुग्णांवर रुग्णालयात आयुष्यमान भारत जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार केले जाणार आहे. शिबिरासाठी राहूल तायडे, डॉ. एस के ठाकुर यांनी परिश्रम घेतले.

निंभोऱ्यात टूडी इको तपासणी

सोयगाव – तालुक्यातील निंभोरा येथे गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वेद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयातर्फे मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी मोफत टू डी इको तपासणी तसेच महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

शिबिरात मोफत टू डी इको तपासणी करण्यात आली, याशिवाय रक्तदाब व ईसीजी कार्डिओग्राफही करण्यात आला. शिबिरात डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील निवासी मेडीसिन डॉ. अब्दुला, सर्जरी अमेय, नेत्ररोग तज्ञ डॉ. अंजली मयेकर, अस्थीरोग तज्ञ डॉ. अंकीत यांनी ६९ रुग्णांची तपासणी केली असून त्यातील नेत्ररोग०८ मेडिसिन ०८ , अस्थीरोग ०७,सर्जरी १, आणि नाक कान घसा १, अशा २५ रुग्णांवर रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत उपचार केले जाणार आहे.

गोजोऱ्यात २५ महिलांची तपासणी

भुसावळ तालुक्यातील गोजोऱ्यात आज महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यात २५ महिलांची तपासणी करण्यात आली.डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. माया आर्विकर, यांचेसह सहायक तज्ञ डॉक्टरांनी महिलांची तपासणी केली. यात २५ महिलांची तपासणी करण्यात येवून यातील ५ महिलांना पुढील आजाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी अक्षरमुद्रा प्रिंटर्स, प्लॉट नं.६, कलेक्टर बंगल्याच्या बाजूला, साने गुरूजी कॉलनी, जळगांव येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com(अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

गोदावरी अभियांत्रिकीत इंडक्शन प्रोग्रॅमवर चर्चा

जळगाव – नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा प्राध्यापकांशी सुसंवाद व त्यांना शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेता यावे या हेतूने गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी २२ ते ३० नोव्हेंबर २०२२ सात दिवसांसाठी इंडक्शन प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, डॉ.नितीन भोळे (विभाग प्रमुख, बेसिक सायन्स अॅण्ड ह्यूम्यानिटीज), प्रा. हेमंत इंगळे (अधिष्ठाता), डॉ.विजयकुमार वानखेडे (ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर) तसेच सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग व प्रथम वर्षाचे सर्व विद्यार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

प्राध्यापक, तसेच सर्व विभाग प्रमुख यांची ओळख नवीन आलेल्या विद्यार्थ्यांना व पालकांना करून देण्यात आली, सुरुवातीला प्रा.शफिक अन्सारी (डेव्हलपमेंट डीन) यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना महाविद्यालयाबाबत विस्तृत माहिती देताना, सोयी सुविधा तसेच महाविद्यालयात राबविण्यात येणारे वेगवेगळे उपक्रम, विद्यार्थ्यांचा सहभाग, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, कौशल्य याबद्दल सांगितले. प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रवर्तन म्हणजे नवीन सुरुवात, आरंभ किंवा कोणत्याही कामासाठी प्रवृत्त करणे असा होय. करिअरच्या सुवर्णसंधी या महत्त्वाच्या विषयावर त्यांनी प्रकाश टाकताना,विद्यार्थ्यांनी त्या आराखड्यानुसार मार्गक्रमण केल्यास नक्कीच विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट नामांकित कंपनीत होईल असे सूतोवाच त्यांनी केले. प्रमुख पाहुणे डॉ. उल्हास पाटील यांनी स्वतःमध्ये अमुलाग्र बदल घडवायचे असतील, तर तुमची अभियांत्रिकीची चार वर्षे या महाविद्यालयाला समर्पित करा. त्याच बरोबर शिस्त, व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य यावर आपले प्रभुत्व महाविद्यालयीन कालावधीतच विकसित करा. नामांकित कंपन्यांमध्ये निवड होण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, देश व विदेश या ठिकाणी आपल्या महाविद्यालयाचे ३००० च्या वर माजी विद्यार्थी कार्यरत आहेत. त्याच पद्धतीने तुमचीही नामांकित कंपन्यांचे मध्ये निवड होऊ शकते, व्यसनापासून दूर राहून नियमित योगाभ्यास करण्यासाठी आवाहन केले.

Godavari Foundation's
G RI COLLEGE OF ENGINEERING, JALGAON
Estd. 1999
uction Program - 2022-23
"प्रवर्तन"
- ORGANISED BY -
BASIC SCIENCES HUMANITI

कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ.सरोज भोळे व प्रा.तृषाली शिंपी यांनी काम पाहिले.तसेच प्रथम वर्ष विभागाचे प्रा.ललिता पाटील, प्रा. संजय चौधरी, प्रा. श्रद्धा वारके यांची मदत या कार्यक्रमासाठी झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. दिपाली पाटील यांनी केले.

कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख डॉ. नितीन भोळे व प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



" गोदामाई

गोदामाई ची पुण्याई काय वर्णावी खरी,
तु आहे मायेची साउली, उल्हासाची तु माऊली 2
प्रेमरूप तु, तीर्थरूप तु
दयारूप तु, धर्मरूप तु,
परमार्थाचे परमरूप तु,
जणू देवात्वाची बाहुली,
तु आहे मायेची साउली,उल्हासाची तु माऊली2
भक्तीरूप तु, शक्तिरूप तु,
मातृरूप तु, दातृरूप तु,
पतितपावन भावरूप तु,
जणू भावार्थची भाऊली,
तु आहे मायेची साउली,उल्हासाची तु माऊली 2
त्यागरूप तु, तपरूप तु,
कर्मरूप तु, मर्मरूप तु,
सत्याचे सार्थरूप तु,
जणू संस्कारांची लाखोली,
तु आहे मायेची साउली, उल्हासाची तु माऊली 2

" रचना : डॉ. प्रवीण चौधरी, रावेर "

भुसावल– येथील जिल्हास्तरीय इंटर स्कूल हॉकी टूर्नामेंट २०२२ मध्ये डॉक्टर उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल भुसावल येथील विद्यार्थ्यांनी रजत पदक प्राप्त केले असून सर्वत्र त्यांच्या यशाबद्दल कौतुक केले जात आहे त्यांना शाळेतील शिक्षक आरिफ सर तसेच विनय काळे सर यांचे मार्गदर्शन लाभले त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. माननीय उल्हास पाटील सर तसेच मुख्याध्यापिका अनघा पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

गोदावरी अभियांत्रिकीत माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन

जळगाव – गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये संगणक विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी २१ नोव्हेंबर २०२२ रोजी माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. विजयकुमार वानखेडे, संगणक प्रमुख प्रा. निलेश वाणी आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मनीष माहेश्व री (§llure Commerce LLP), दिव्य पटेल(Ninja Techno Labs) आणि अली अजगर(Entrepreneur AZ Guards, LLP) हे उपस्थित होते.

सुरुवातीला संगणक विभाग प्रमुख निलेश वाणी यांनी आलेल्या माजी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रसंगी संगणक विभागाचे प्रा. निलेश चौधरी प्रा. प्रशांत शिंपी, प्रा.पूनम पाटील यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात उपस्थित असलेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अली अजगर यांची स्वतःची AZ Guards LLP company असून त्या माध्यमातून ते ई कॉमर्स डेव्हलपमेंट, वेब डेव्हलपमेंट, एंटरप्राइज सोल्युशन अशा प्रकारच्या विविध सर्विसेस देत असतात.त्यांच्या मार्गदर्शनामध्ये त्यांनी Self -nalysis, Self Development, Management, communication Skill या महत्त्वाच्या विषयांवर प्रकाश टाकला. नामांकित कंपन्यांमध्ये निवड होण्यासाठी या सर्व बाबी अतिशय महत्त्वाच्या असतात व त्यानुसार विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करणे गरजेचे असते.

औद्योगिक क्षेत्रातील मनुष्यबळाकडे काही विशेष कौशल्य असल्याशिवाय त्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होत नाही. त्यामुळे महाविद्यालयीन कार्यकाळातच विद्यार्थ्यांनी अधिकाधिक कौशल्य आत्मसात केली पाहिजे. स्पर्धेच्या युगात व्यक्तिमत्व विकासाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असून त्यावरून नोकरीसाठी निवड होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे प्रकर्षाने व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य देणे हे खूप गरजेचे आहे.सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन गणेश राज पाटील या विद्यार्थ्याने केले.

गोदावरी अभियांत्रिकी आणि पॉलिटेक्निकमध्ये उद्योजकता 'संधी आणि आव्हाने' वर मार्गदर्शन

जळगाव – गोदावरी अभियांत्रिकी आणि पॉलिटेक्निक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी Entrepreneurship Development Program अंतर्गत उद्योजकता – संधी आणि आव्हाने या विषयावर दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याते म्हणून श्री विनोदजी तुपे, प्रकल्प अधिकारी जिल्हा उद्योग केंद्र जळगाव आणि श्री दिनेश गवळी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी जिल्हा उद्योग केंद्र, जळगाव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, पॉलिटेक्निक समन्वयक प्रा.दिपक झांबरे, महाविद्यालयाचे अधिष्ठाता प्रा. हेमंत इंगळे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. सुरुवातीला आलेल्या मान्यवरांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर कार्यक्रमात मार्गदर्शन करताना विनोद तुपे यांनी विद्यार्थ्यांना जिल्हा उद्योग केंद्राच्या कोणकोणत्या योजना असतात याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यामध्ये त्यांनी सांगितले जर आपल्याला व्यवसाय सुरू करायचा असेल तर वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून आपण तो सुरू करू शकतो. तसेच जिल्हा उद्योग केंद्र योजना व त्यासाठी असलेले निकष व तसेच त्या संबंधित कागदपत्रे याबद्दलची माहिती त्यांनी दिली.कार्यक्रमाचे व्याख्याता दिनेश गवळी यांनी उद्योजकता विकास ासंदर्भात व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास तसेच विकास व्यवसाय व्यवस्थापन, त्याचप्रमाणे शासनाच्या विविध असणाऱ्या संस्था तसेच अर्थसहाय्य देणाऱ्या संस्था याबद्दल सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन आशिष खाचणे (तृतीय यंत्र), डॉली घेटे (प्रथम यंत्र) यांनी केले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या पॉलिटेक्निक विभागाच्या प्रा. हर्षा पाटील यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाला सर्व विभाग प्रमुख तसेच प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

एसएसबीटी, बांभोरी फार्मसीची डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाला भेट

जळगाव – बांभोरी एसएसबीटी फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार दि.१८ नोव्हेंबर रोजी डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला भेट दिली. सर्वप्रथम डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस. आर्विकर यांचा एसएसबीटी फार्मसी महाविद्यालयातर्फे पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयातील ॲनॉटॉमी विभागाच्या प्रो.डॉ.अनिता फटिंग यांच्यासह अन्य प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना शरिरशास्त्र विषयाची माहिती देवून म्यूझियम दाखविले. विद्यार्थ्यांनी देखील माहिती जाणून घेतली. याप्रसंगी एसएसबीटीच्या लेक्चरर कोमल खिल्लारे, सुरजसिंग परदेशी, दिपिका हटनारे, गौरव शेजवळ यांच्यासह ४८ विद्यार्थ्यांनी भेटीदरम्यान उपस्थिती होती.

गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी लिव्हर ॲण्ड एन्डोस्कोपी सेंटरचा शुभारंभ

जळगाव – डॉ.विपुल चौधरी यांचे गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी लिव्हर अँड एन्डोस्कोपी सेंटर आणि डॉ. प्रीती चौधरी यांच्या आय हॉस्पिटलचे उद्घाटन हे गोदावरी समूहाचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ.उल्हास पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून सायन हॉस्पिटल, मुंबई. प्रोफेसर तथा संचालक डॉ.मेघराज इंगळे प्रोफेसर डॉ. विकास पांडे यांची उपस्थिती होती.डॉ. सुनील चौधरी, डॉ. पुष्पा चौधरी, डॉ.प्रीती चौधरी, गोदावरी फाउंडेशनच्या सदस्य डॉ.केतकीताई पाटील हृदयविकार तज्ञ डॉ.वैभव पाटील, डॉ. स्नेहल फेगडे आणि जळगाव मधील अनेक प्रतिष्ठित डॉक्टर व नागरिक उपस्थित होते.जिल्हापेठ पो.स्टे समोर हे रूग्णालय सुरू करण्यात आले आहे.

संपादकीय...

गोवर गफलत

गोवर, कांजण्या, गालगुंड इत्यादी हे दरिद्री विश्वाचे आजार. गेली ६०-७० वर्षे सरकारी पातळीवर सातत्याने त्याविरोधात लसीकरण मोहिमा राबवल्या गेल्याने आपण त्यांच्यावर विजय मिळवला. असेच कौतुकास्पद उदाहरण पोलिओचे. ज्या वेळी लसकुपींवर उच्चपदस्थांची छायाचित्रे छापण्याची पद्धत नव्हती, त्या वेळी आपल्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील कर्मचारी, 'आशा', 'अंगणवाडी ताई' इत्यादी कर्मचाऱ्यांनी अगदी घरोघरी जाऊन विविध आजारांविरोधात लसीकरण मोहिमा राबवल्या. त्याही आधी, 'देवीचा रोगी कळवा आणि हजार रुपये मिळवा' यासारख्या घोषणांतून या आणि अशा आजारांबाबत आपल्याकडे मोठी जागृती झाली. तथापि त्या वेळी जे घडले त्याचा पुढचा टप्पा आपण गाठू शकलो असे म्हणता येणार नाही. याचे कारण त्यासाठी आवश्यक साधन-संपत्तीची आवश्यकता. आपल्याकडे शिक्षण क्षेत्रासाठी सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन-अडीच टक्क्यांवर अडकलेली तरतूद आपण कधी तरी ओलांडू हे जसे स्वप्न तसेच सार्वजनिक आरोग्यावरही किमान अडीच-तीन टक्क्यांपेक्षा अधिक खर्च करू शकू हे दिवास्वप्न. याचप्रमाणे आपल्या दरडोई आरोग्य खर्चातही गेल्या आठ वर्षांत फार काही वाढ झालेली नाही. केंद्र सरकारच्याच आरोग्य खात्याने प्रसृत केलेल्या आकडेवारीनुसार २०१३-१४ साली जो दरडोई आरोग्य खर्च ३१७४ रुपये इतका होता तो २०१८-१९ साली जेमतेम ३३१४ रु. इतका झाला. या संदर्भात एक साधा हिशेब असा की देशाची अर्थव्यवस्था जर किमान सहा-सात टक्क्यांनी वाढत असेल तर शिक्षण आणि आरोग्य या अत्यंत पायाभूत विषयांवरील खर्चातही त्या प्रमाणात वाढ व्हायला हवी. तशी ती होत नाही आणि हे अशा काही साथींचा फटका बसल्याखेरीज आपल्या व्यापक समाजमनास कळतही नाही.

यात लाजिरवाणा भाग असा की अत्यंत क्षुद्र असे आजार आपल्याकडे जीवघेणे ठरतात. गोवर हा त्यातील एक. वेळच्या वेळी होणाऱ्या लसीकरणाने हे आजार पूर्ण टाळता तरी येतात अथवा त्यांचा जीवघेणा दंश निष्प्रभ करून टाकता येतो. पण करोनोत्तर काळात या साध्या सत्याकडे दुर्लक्ष झाल्याने गोवरसारख्या दुर्लक्ष कराव्या अशा आजाराचे साथीत रूपांतर होताना दिसते. डेंग्यू, चिकुनगुनिया वा मलेरिया हे तर डासांमुळे पसरणारे आजार. पावसाळा संपला की हमखास आपल्याकडे त्यांची साथ येते. यामागील कार्यकारण भाव लक्षात येणे अवघड नाही. पण डासांची निर्मिती थांबवण्याइतकी स्वच्छता आपण पाळू शकत नाही. अशा परिस्थितीत इतके स्वच्छ राहणे ज्यांना परवडते ते आपापल्या आरोग्याची काळजी घेतात. म्हणजे याबाबतही शिक्षणासारखीच परिस्थिती. त्या क्षेत्रातही पुरेशा तरतुदीची बोंब असल्याने जनसामान्यांसाठी शिक्षण व्यवस्था रसातळास गेलेली. तीकडे दुर्लक्ष करून धनवानांच्या मुला/बाळांस पंचतारांकित शिक्षण मिळू शकते. त्याचप्रमाणे सधन मंडळी आपापल्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. आरोग्यदायी वातावरणात राहतात आणि आरोग्यदायी अन्न खातात. पण देशाचे आरोग्य (दुर्दैवाने) अशा भाग्यवानांच्या सौष्ठवपूर्ण देहाकारावर मोजले जात नाही. दारिद्र्यरेषेखालील नागरिकांच्या तंदुरुस्तीसाठी काय आणि किती केले जाते यावर त्या त्या देशाची प्रकृती मोजली जाते. तेथेच नेमके आपले आरोग्याचे घोडे पेंड खायला जाते.

या साथीचा प्रसार वेग लक्षात घेता यात तातडीने बदल व्हायला हवा आणि आगामी लाट टाळण्यासाठी व्यापक लसीकरण मोहीम हाती घ्यायला हवी. एरवी स्वत:च जगाचे लसकेंद्र म्हणवून घेण्याचा काय फायदा? जागतिक स्तरावर मोठे होण्याच्या नादात आपण घरच्या आघाडीवर रोगग्रस्त राहून चालणारे नाही. त्यासाठी ही गोवर गफलत टाळायला हवी.

मुख कर्करोग

मुख कर्करोग जीभ, ओठ, हिरड्या, टाळू किंवा गालांच्या आतील बाजुस होतो. गुटखा, सिगरेट वा तत्सम पदार्थांमधून तंबाखूचे सेवन हे मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण आहे. लवकर निदान झाल्यास मुखाच्या कर्करोग पूर्णपणे बरा होऊ शकतो.



मुख कर्करोगाचे प्रकार -

✻ ओठ कर्करोग
✻ जीभ कर्करोग
✻ हिरडया कर्करोग
✻ ओठ व गालाचे आतल्या भागातील नाजूक आवरण कर्करोग
✻ जबडयाच्या आतील खालचा भाग कर्करोग
✻ जबडयाच्या आतील वरचा भाग कर्करोग
✻ टाळू अक्कल दाढेचा मागचा भाग कर्करोग

लक्षणे

ओठावर किंवा तोंडात २ आठवडयानंतरही बरी न होणारी जखम, ओठावर , तोंडात किंवा घश्यात गाठ, गालाच्या आतिल भागात , टाळू आणि जिभेवर पांढरा चिरविकापीदाह किंवा लाल जखम, असमान्य रक्तस्त्राव , दुखणे किंवा तोंडात बधीरता, घसा खवखवणे, घशात काहीतरी अडकल्यासारखे वाटणे, चावतांना, गिळतांना, बोलतांना त्रास होणे किंवा दुखणे, जबडयावर सुज येणे , दातांची कवळी नीट न बसणे किंवा त्रासदायक अस्वस्थता जाणवने, आवाज बदलणे आणि कान दुखणे, मानेवर सुज.

संपर्क - दीपक पाटील

- स्वत: करावयाची तपासणी -

✻ पाण्याने स्वच्छ गुळण्या करा , पुरेशा प्रकाशात आरशासमोर उभे रहा .
✻ तोंडामध्ये लाल किंवा पांढरा थर , जखम , व्रण , रखरखीतपणा , दाणेदारपणा , सुज कुठे दिसते का हे आराशात पहा .
✻ काही शंकास्पद आढळल्यास त्या ठिकाणी बोट फिरवा . तोंडाच्या आतील साधारण आवरण मऊ व गुलाबी असते .

✻ काही वेगळेपणा आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

संपर्क - दीपक पाटील

प्रोस्टेट कर्करोग

प्रोस्टेट कर्करोग म्हणजे काय?
पुरुषांमधील सर्वात सामान्य प्रकारचे कर्करोगां पैकी एक प्रोस्टेट कर्करोग म्हणजे प्रोस्टेट नावाच्या प्रजनन प्रणालीच्या लहान ग्रंथीमधील पेशीची अनियंत्रित वाढ होय. त्याचे मुख्य चिन्हे आणि लक्षणे काय आहेत? प्रोस्टेटचे कर्करोग कोणतीही चिन्हे किंवा लक्षणे दर्शवू शकत नाहीत किंवा प्रगत अवस्थेपर्यंत पोहोचल्या शिवाय दर्शवू शकत नाहीत. काही प्रकरणांमध्ये, विशिष्ट लक्षणे अंतर्भूत कर्करोगाचे संकेत मानले जातात.

हे चिन्हे आणि लक्षणे आहेत

लघवी करताना वेदना किंवा जळणारे संवेदना. सुधारणा करण्यासाठी अडचणी.मूत्र किंवा वीर्य मधून रक्त जाणे. गुदाशय किंवा पेल्व्हिस, जांघ, किंवा हिप्सच्या भागामध्ये वेदना. मूत्राचे ड्रिब्लिंग/थेंब थेंब गळणे.मूत्राचा एक प्रवाह सुरू करण्यात अडचण.

निदान आणि उपचार कसे केले जाते?



प्रोस्टेट कर्करोगाच्या उपस्थितीसाठी सर्वात निर्णायक आणि निश्चित चाचणी ही मूत्रवैज्ञानिकांनी केलेली बायोप्सी आहे.

इतर चाचण्यांमध्ये डिजिटल रेक्टल परीक्षा (डीआरई) चाचणी आणि प्रोस्टेट-स्पेसिफिक अँटीजन (पीएसए) चाचणी समाविष्ट असते. तथापि, ते प्रोस्टेटमधील कर्करोगाची पुष्टी करत नाहीत कारण वाढ इतर संक्रमणां मुळे किंवा प्रोस्टेटच्या गैर-कर्करोगाच्या वाढीचा परिणाम असू शकतो.

प्रोस्टेट कर्करोगाचा उपचार जास्त करून यशस्वी होतो. ददिली जाणारी काही औषधे आणि उपचार अश्या प्रकारे आहेत:

रेडिएशन थेरेपी - डॉक्टर कर्करोगाच्या पेशींना गामा किरणांसारखे थेट किरणे देतात.

शस्त्रक्रिया - ट्यूमरचा प्रसार झाला नाही आणि लहान असलेल्या अवस्थेत लवकर ट्यूमरवर शस्त्रक्रिया करून ते काढून टाकण्याचा प्रयत्न केला जातो.

केमोथेरपी - प्रगत प्रकरणांमध्ये कर्करोगाच्या उपचारांसाठी केमोथेरपी उपयुक्त आहे जिथे हा कर्करोग पसरलेल्या असतो.

औषधे - कर्करोगाच्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करण्यासाठी काही औषधेदेखील दिली जाऊ शकतात.

प्राचीन खान्देश-१

खानदेशातील अश्मयुगीन स्थळे

महाराष्ट्र आणि खानदेश

प्रकरण ३ : विकास आणि नैसर्गिक स्थान

अजिंठा लेणी

अजिंठा लेणी बद्दल सविस्तर नोंदी १८८० मधील खानदेश गॅझेटियर मध्ये आहेत. अजिंठा डोंगर इंद्र्याद्री या नावाने ओळखला जातो. वाघुर नदीचा उगम याच डोंगराच्या कुशीत होतो. डोंगरमाथ्यावर वसलेले लेणापूर गावात बरेच प्राचीन अवशेष दिसतात. इसवी सन चौथ्या शतकातील चीनी प्रवासी फाहीन तसेच इसवी सनाच्या सहाव्या शतकात प्रवासी युवानश्वांग दोन्ही प्रवाश्यांच्या नोंदीत अजिंठा लेणीचे वर्णन सापडते. युवानश्वांग या प्रवाश्याने अजिंठ्याला भेट दिली नाही. पण चालुक्य पुलकेशी दुसरा याचे दरबारी तो राहिला होता व त्याचे वर्चस्व येथील भुभागावर होते असे दिसते. बदामी -कलादारी ही त्याची राजधानी होती.

इतिहास
खान्देशचा
NANDURBAR
DHULE
JALGAON

त्याआधी बऱ्याच विद्वानांनी अजिंठा लेणीचा ऊहापोह केला आहे. सर्वात मोठे योगदान वॉल्टर स्प्रिंक यांचे आहे. त्यांच्या मते, इसवीसन पूर्व पहिल्या शतकातील काही लेण्या कोरल्या गेल्या. महाराष्ट्रातील इतर ठिकाणी जसे भाजे, बेडसे कार्ला येथील लेणी कोरल्या गेल्या, त्याच काळातील ही लेणी कोरलेली आहेत. सगळ्या नाही पण लेणी नंबर ९, १०, १२, १३, १५ ह्या आहेत. पण या लेणी सर्व समाजातील घटकांनी मिळून कोरल्या आहेत. आंध्रभूत्य सातकर्णी असा शिलालेखात उल्लेख आहे तसेच लेणी नंबर ९, १० मधील शिलालेखात वशिष्ठीपुत्र काताहाडी यांच्या दानातील आहेत. लेणी क्रमांक बारा मधील लेखात ब्राम्ही लिपीतील गानामादादा या व्यापारी दानकर्त्याचा उल्लेख आहे. नंतरच्या तीनशे वर्षे नवीन लेणी कोरल्या गेल्या नाहीत. इसवीसनाच्या चौथ्या शतकातील चीनी प्रवासी फाहीन मात्र येथे बौद्ध तिर्थयात्रेसाठी येतात पण स्थानिक लोकांना बुद्धाचे नियम माहित नाहीअसे वर्णन करतो.

या लेण्यांचा उल्लेख ह्युएन त्संग यानें केलेला आढळतो. पण तो येथें आला नव्हता. त्याच्या वर्णनावरून असें दिसतें कीं, त्या वेळीं या गुंफा बौद्धधर्मीयांचें तीर्थयात्रेचें स्थान असून हजारों मुनष्यांची तेथें सतत येरझार चालत असे. पुढें कंपनी सरकारच्या मद्रासच्या अंमलदारांना अजिंठ्याच्या लोकांच्या तोंडून तेथें लेणीं असल्याचें कळलें, परंतु रस्ता अति बिकट व भीतिप्रद होता. तरी जनरल सर जेम्स अलेक्झांडर यानें तेथें जाण्याचें धाडस केलें. मार्गांत अनेक संकटें आली तरी शेवटीं तो मुख्य जागीं जाऊन पोहोंचला. सर्व लेणीं पाहून तो अगदीं थक्क होऊन गेला. व त्यानें हीं लेणीं प्रसिद्धीस आणलीं. तरी पुढें १८४९ पर्यंत त्या लेण्यांची उपेक्षा केलेली आढळते व तोंपर्यंत येथें जाण्याचा रस्ताही फार बिकट व भीतिप्रद होता. १८४९-५५ यांच्या दरम्यान कोर्ट डायरेक्टर्सनीं मेजर गिल यास येथील कांहीं चित्रांच्या नकला करण्यास पाठविलें.

सौ. सरला भिरुड
संशोधक व लेखिका

(क्रमशः)

जोडप्यासाठी अनुकूल पर्यटन स्थळ

बाली, इंडोनेशिया

देवांची भूमी म्हणूनही ओळखले जाणारे, बाली ज्वालामुखी आणि शांतता आणि प्रसन्नता पसरवणाऱ्या हिरवीगार टेरेस्ड भाताच्या शेतांच्या निखळ नैसर्गिक सौंदर्याद्वारे आकर्षित करते. हे सर्फर्सच्या नंदनवनासाठी देखील प्रसिद्ध आहे! बाली आपल्या नाट्यमय नृत्यांनी आणि रंगीबेरंगी समारंभांनी, कला आणि कलाकुसरीने, त्याच्या आलिशान बीच रिसॉर्ट्स आणि रोमांचक नाइटलाइफने मंत्रमुग्ध करते. आणि सर्वत्र, तुम्हाला गुंतागुंतीची कोरीव मंदिरे आढळतील.

देवांच्या हस्तकला

बालीमध्ये हजारो गिफ्ट शॉप्स आहेत. Denpasar पासून Ubud पर्यंत, तुम्हाला अनेक गोष्टी सापडतील ज्या तुम्हाला घरी परत आणायच्या आहेत. बालिनीज स्वाक्षरी स्मरणिका मधुर स्नॅक्स आणि शीतपेयेपासून तेनुन बाली सारख्या उत्कृष्ट हस्तकला वस्तूंपर्यंत आहे.

तुम्ही घरी स्मृतीचिन्हे आणण्याचा विचार करत असाल, तर तुमची सर्वोत्तम पैज म्हणजे सुकोवती येथील स्मरणिका बाजार आहे, जिथे तुम्ही निवडीमुळे भारावून जाऊ शकता.

बहुतेक तारांकित हॉटेल्स समुद्रकिनाऱ्याजवळ आहेत. काहींचे विशिष्ट समुद्रकिनाऱ्यांवर स्वतःचे खाजगी ठिकाणे देखील आहेत, जिथे तुम्ही अनन्य विशेषाधिकार मिळवू शकता. तुम्ही त्यांना कुटा, सनूर आणि सेमिन्यक सारख्या लोकप्रिय ठिकाणी सहज शोधू शकता.

वातावरणाचा आस्वाद घ्या

बाली विषुववृत्ताच्या ८ अंश दक्षिणेस स्थित असल्याने, तुम्हाला दोन मुख्य विशिष्ट ऋतू: कोरडे ऋतू आणि पावसाळी हंगाम असलेले हवामान वर्षभर सामान्य उष्णकटिबंधीय, उष्ण आणि दमट असल्याचे आढळेल. बालीच्या मध्यवर्ती पर्वत (ज्वालामुखी) सभोवतालच्या काही भागात समुद्रसपाटीपासून ३,००० मीटरपेक्षा जास्त शिखरे आहेत. येथे तापमान बऱ्यापैकी थंड आहे आणि किनारपट्टीच्या भागांपेक्षा जास्त पाऊस पडतो.

बालीचे पांढरे किनारे कौटुंबिक सुट्टीसाठी नक्कीच आवडते ठिकाण आहे. केळी बोटी, पॅरासेलिंग किंवा जेट स्कीइंग, पोहायला जा किंवा तुम्ही समुद्राजवळ राहून सूर्यस्नानचा आनंद लुटू शकता. कुटा हे बालीमधील सर्वात प्रसिद्ध समुद्रकिनाऱ्यांपैकी एक आहे.

या विस्तारासोबत हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, दुकाने आणि कॅफे आहेत. संध्याकाळी डिस्को म्युझिकच्या तालावर परिसर दणाणून जातो.

शांत संध्याकाळसाठी जिम्बरान येथील समुद्रकिनाऱ्याचा आनंद घ्या, ताजे बार्बेक्यू केलेले सीफूड खाण्याचे एक लोकप्रिय ठिकाण. सेमिन्याक हे पंचतारांकित आंतरराष्ट्रीय हॉटेल्स आणि फॅन्सी डायनिंग स्पॉट्सने भरलेल्या आलिशान निवासस्थानांचे घर आहे. सनूर बीचवर हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सचीही भर पडली आहे. तुम्ही नुसा दुआला देखील भेट देऊ शकता, जिथे अधिक खाजगी समुद्रकिनारे समोर सुपर डीलक्स हॉटेल आहेत.

रोहित अग्रवाल,
सहा.प्राध्यापक,
हरीभाऊ जावळे इन्स्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी

देवस्थान :- मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग

मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग १२ पवित्र ज्योतिर्लिंगांमध्ये द्वितीय स्थान आहे. हे आंध्र प्रदेशात कृष्णा नदीच्या तटावर श्रीशैल नाम के पर्वतावर स्थित आहे. हे मंदिर दक्षिण का कैलाश पर्वत सांगितले आहे. महाभारतात दिलेल्या वर्णनानुसार श्रीशैल पर्वतावर भगवान शिवाचे पूजन करणे अश्वमेध यज्ञ करण्याचे सामान प्राप्त होते. माता पार्वती का नाम मल्लिका आहे आणि भगवान शिव अर्जुन म्हणतात. या प्रकाराचा उपयोग करून श्रीमल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाचे नाव येथे आहे. मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग देवी का महाशक्ति पीठ भी है। येथे माता सती की ग्रीवा (गरदन या गला) गिरी थी।

श्रीशैलम मंदिर / मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग कसे पाहुचें?

मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगावर जाण्यासाठी आधी हैदराबाद गाठावे लागते. हैदराबाद ते मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाचे अंतर २१३ चौरस आहे. येथून बस, टॅक्सी किंवा अन्य मार्गाने मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगापर्यंत पोहोचता येते. हैदराबादमध्ये ३ बस स्टँड आहेत. श्रीशैलमला जाणाऱ्या बस जेबीएस (ज्युबिली बस स्टँड) बस स्टँड आणि एमजीबीएस (महात्मा गांधी बस स्टँड) बस स्टँड येथून सुटतात. तुम्ही ऑनलाइन बस तिकीट बुक करू शकता. तिरुपती बालाजीलाही गेलात तर तिरुपती ते मल्लिकार्जुन हे अंतर ३६९ चौरस आहे. सहज येथून तिरुपती ते श्रीशैलम या बसेस उपलब्ध आहेत.

श्रीशैलम मंदिरच्या जवळच रेलवे स्टेशन कंबम आहे. जे श्री शैलम पासून ६० वर्ग दूर आहे. इथे खूप कम ट्रेन रुकती आहे. दुसरा जवळील रेल्वे स्टेशन मार्कापुर श्रीशैलम से ९० किलोमीटर की दूर आहे. येथे दक्षिण भारतच्या शहरातून अनेक ट्रेन चालत आहेत.

सुविचार

कोणतेही कार्य हे अडथळ्याशिवाय पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करत राहतात त्यानांच यश प्राप्त होते.

संत तुकाराम सार्थ गाथा

अभंग क्र. ४८

आशाबद्ध जन ।
काय जाणे नारायण ।।१।।
करी इंद्रियांची सेवा ।
पाहे आवडीचा हेवा ।।ध्रु.।।
भ्रमलें चावळे ।
तैसें उचित न कळे ।।२।।
तुका म्हणे विषें ।
अन्न नाशियलें जैसें ।।३।।

अर्थ – प्रपंच्याविषयी आसक्त असणारे जिव परमेश्वराला काय जाणून घेऊ शकतात? त्यांना स्वता:च्या इंद्रियाची सेवा करण्यास आनंद वाटतो .तो भ्रमिष्ट स्वता:च्या जीवनाचे हित जाणु शकत नाही .तुकाराम महाराज म्हणतात, सुग्राम अन्नात विष कालवले असता ते सर्व अन्न वाया जाते, त्या प्रमाणे मनात भोगलालसा असणाऱ्या जीवाचे जीवन व्यर्थ जाते.

सप्ताहातील दिनविशेष

दि. २९ राष्ट्रीय कायदा दिन.
दि.१ डिसें. जागतिक एडस् प्रतिबंधक दिन
दि.२ आंतरराष्ट्रीय संगणक साक्षर दिन
दि. ३ आंतरराष्ट्रीय विकलांग दिन
दि. ४ नौदल दिन



मनःशांतीचा उत्तम मार्गः बायकोच्या मनासारखं वागा!

पाककृती

खजूर मिल्क शेक

साहित्य – २ कप दूध, १२ खजूर, ३ ते ४ काजू, २ हिरवी वेलची

कृती – सर्वप्रथम खजूर चांगला साफ करून त्याचे बारीक तुकडे करुन घ्या. त्यानंतर काजूचे बारीक तुकडे करून, हिरव्या वेलचीच्या दाण्यांची पुड करून घ्या. नंतर मिक्सरमध्ये खजुराचे बारीक केलेले तुकडे आणि थोडे दूध घालून चांगले फिरवून घ्या. आता त्यात वेलची पावडर आणि उरलेले दूध घालून पुन्हा मिक्समधून फिरवा. शेवटी बर्फाचे तुकडे घालून पुन्हा एकदा मिक्समधून फिरवून घ्या. त्यानंतर तयार झालेले खजूराचे मिल्क शेक एका ग्लासात ओतून काजूच्या

किचन टिप्स

✻ स्वयंपाकासाठी लागणारे मसाले, चटण्या, पेस्ट, प्युरी आधीच तयार करून ठेवा. दह्यामध्ये कोणतेही मसाले अथवा मीठ मिसळणार असाल तर ते नीट घुसळून घ्या.

✻ फ्रिजमध्ये व्हेजिटेबल आणि नॉन व्हेजिटेबल असे दोन्ही स्टॉक तयार ठेवा. ज्यामुळे सूप अथवा इतर पदार्थ करणं सोपं जाईल.

✻ एखाद्या पदार्थांसाठी खसखस मिक्सरमध्ये वाटायची असेल तर ती आधी पंधरा मिनीटे पाण्यात भिजत ठेवा. लिंबाचा रस व्यवस्थित निघण्यासाठी लिंब काही मिनीटे कोमट पाण्यात बुडवून ठेवा.

✻ मसाला खराब होऊ नये यासाठी त्यामध्ये हिंगाचे खडे ठेवा.

✻ भेंडीच्या भाजीत एक चमचा दही मिसळले तर ती चिकट होत नाही.

पाककृती

थालीपीठ

साहित्य – एक कप तांदळाचे पीठ, एक कप ज्वारीचे पीठ,एक कप बाजरीचे पीठ, एक कप गव्हाचे पीठ, अर्धा कप बेसण, अर्धा कप मूगडाळीचे पीठ, चिरलेला कांदा, चिरलेली कोथिंबीर, हिरवी मिरची,आलं, लसणाची पेस्ट, धण्याची पावडर, जिरा पावडर, हळद, मीठ, लाल तिखट, एक उकडलेला बटाटा, तेल

कृती – चिरलेला कांदा, मिरची, आलं, लसणाची पेस्ट, कोथिंबीर एकत्र करून त्यात हळद, लाल तिखट, मीठ, धण्या-जिऱ्याची पावडर एकत्र करा. सर्व प्रकारची पीठे वरून बेताने टाका. सर्व मिश्रण एकत्र करा. बटाटा कुस्करून टाका. मिश्रणाला गरज असल्यास पाण्याचा हात लावा. मळलेले पीठ काही मिनीटे ओल्या फडक्यात गुंडाळून ठेवा. पोळपाटावर ओले कापड अथवा केळ्याचे पान ठेवा आणि त्यावर तेलाचा हाताने थालिपीठ थापून घ्या. तवा गरम करा आणि थालिपीठ भाजून अथवा तळून घ्या. नारळाची चटणी, लोण्यासोबत गरमागरम वाढा

थंडीपासून त्वचेचे रक्षण करण्यासाठी टिप्स...

✻ साबणामुळे त्वचा ड्राय होण्याची शक्यता लक्षात घेऊन साबणात कोणते कंटेट आहेत, याची माहिती घ्या. कोणता साबण आपल्या त्वचेच्यादृष्टीने योग्य आहे, याची माहिती घेऊन वापरला जावा.

✻ हिवाळ्यात त्वचा सॉफ्ट राहण्यासाठी त्वचेला सूट होईल अशीच क्रीम अथवा बॉडीलोशन वापरावे.

✻ थंडीत कडक पाण्याने आंघोळ केल्यामुळे त्वचा जास्त ड्राय पडू शकते. त्यामुळे शरीराला मानवेल एवढे गरम पाणी आंघोळीसाठी घेतले जावे.

✻ गाडी चालविताना हाताची त्वचा कोरडी पडू नये म्हणून हाताला क्रीम किंवा लोशन लावून त्यावर ग्लोज घालावेत.

✻ स्वेटर, कानटोपी गाडी चालविताना वापरा. शक्य असेल तर हेल्मेटचा वापर करा. थंडीमुळे हाताच्या बोटांनाही त्रास होण्याची शक्यता असल्याने गाडी चालवताना हँड ग्लोजही वापरणे इष्ट असते.

✻ थंडीत पायांना भेगा पडत असतील तर कोमट पाण्यात गुलाबपाणी टाकून त्यात थोडा वेळ पाय ठेवावेत. तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य क्रीम वापरा.

✻ पाय कोरडे पडू नयेत म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्याने लोशन अथवा क्रीम लावावे. एखादी शरीराला सूट न होणारी क्रीम वा लोशन असेल तर ते लावल्याने रिॲक्शनही येऊ शकते. त्यामुळे त्यादृष्टीने काळजी आवश्यक.

✻ थंडीच्या दिवसांमध्ये ओठांची काळजी घ्यावी. ओठ कोरडे पडल्याने त्याला भेगा पडू शकतात. ओठांना लीप लोशन किंवा लीप बाम लावून घराबाहेब पडावे. ओठांना लोणी, दुधाची साय अथवा गावरान तूपदेखील लावू शकता.

✻ घरातही शक्यतोवर स्लीपरचा वापर करावा. अनवाणी पायाने फिरणे टाळावे. त्यामुळे सर्दी, पायदुखी, टाचादुखीचा त्रास होत राहतो.

स्किन संबंधित समस्यांसाठी
आजच संपर्क साधा
डॉ.दिनेश कुलाळ
८४५९३९४८१३

उपकार

एका गावात एक श्रीमंत माणूस राहात होता. तो कधीच दानधर्म करीत नसे पण लोक त्याला देशभक्त मानत असत. एकदा तो देवाचे दर्शनासाठी गेला. स्वच्छ हातपाय धुवून दर्शन घ्यावे म्हणून तो नदीवर गेला. हात पाय धुता धुता पाय घसरुन पाण्यात पडला व गटांगळ्या खाऊ लागला. त्याला बाहेर काढण्यास कोणाचाच धीर होईना. तेवढ्यात एका साधूचे त्याचेकडे लक्ष गेले. साधूने त्याला सुखरुप पाण्याबाहेर काढले. साधूला देण्यासाठी त्याने खिशातून खूप पैसे बाहेर काढले पण दिली एक पावली. हे बघून काठांवरच्या लोकांना खूप राग आला.एकाने तर त्याला उचलून पाण्याजवळ नेले व पाण्यात फेकून देऊ लागला हे पाहून साधू म्हणाला त्याला पुन्हा पाण्यात ढकलू नका, लोकांनो त्याने स्वःताच्या किंमतीप्रमाणे बक्षीस देण्यासाठी पावली बाहेर काढली.आता गावात त्याला एवढीच किंमत मिळेल. हे ऐकूताच श्रीमंत माणूस खजील झाला.

तात्पर्य:– उपकार कर्त्याचे उपकार स्मरणे हे आपले परम कर्तव्य आहे.

बोधप्रद गोष्ट

हाडांसह सांधेदुखीवर ऑर्थोस्कोपीद्वारे उपचार

जळगाव – डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात ऑर्थोस्कोपीद्वारे उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. यात लिगामेंट रिपेअर, गादी फाटण्याचे आजार, कार्टिलेजची समस्या, हाडांच्या तुटलेल्या तुकड्यांना काढणे, आखडलेल्या सांध्यावर उपचार, सांध्यामधील इन्फेक्शनवर उपचार, सांध्याची सफाई करणे, सांध्याच्या आतील फ्रॅक्चरवर उपचार येथे केले जातात. अधिक माहितीसाठी रेसिडेंट डॉ.सुनित वेलणकर यांच्याशी ८२०८०८८८६८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

माजी खा.डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांचे २८ रोजी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात व्याख्यान

भारताची सौम्य संपदा विषयावर विद्यार्थ्यांशी करणार हितगुज

जळगाव – भारतीय सांस्कृतिक संबंध परिषेदेचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खा. डॉ. विनयराव सहस्त्रबुध्दे यांचे दि. २८ रोजी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात दुपारी ३ वा. भारताची सौम्य संपदा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यावेळी डॉ. सहस्त्रबुध्दे हे विद्यार्थ्यांशी हितगुजही करणार आहेत.

भारतीय सांस्कृतिक संबंध परिषेदेचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खा. डॉ. विनयराव सहस्त्रबुध्दे हे दि. २७ आणि २८ रोजी जळगाव दौर्यावर येत आहे. डॉ. सहस्त्रबुध्दे यांचा हा दौरा खासगी असून ते आप्तेष्टांच्या भेटी घेणार आहेत. तसेच डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांचे भारताची सौम्य संपदा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. दि. २८ रोजी दुपारी ३ वा. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ. केतकी सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. तसेच याठिकाणी डॉ. विनय सहस्त्रबुध्दे हे विद्यार्थ्यांशी देखिल हितगुज करणार आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे चेअरमन तथा माजी खा. डॉ. उल्हास पाटील, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन.एस. आर्विकर, गोदावरी फाऊंडेशनच्या सदस्या डॉ. केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमानंतर डॉ. विनय सहस्त्रबुध्दे हे डॉ. उल्हास पाटील यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देणार आहेत. तरी या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

आई

आई म्हणजे काय असते शब्दात काय सांगावे...
आई म्हणताच ओठी,डोळ्यात श्रावणमेघ दाटावे..
स्पर्श चंदन शीतल, मनी भरले वात्सल्य,
माया मोजता मोजता,होई जन्माचे साफल्य,
वाणी अमृताची खाण, नेती प्रेमाचाच पूर,
नऊ मास पोटी संभाळले,किती उपकार थोर,
पान्हा पाजता पाजता, जणु पाजते आभाळ...
आई तुझ्यामुळेच येते, जीवनात लढण्याचे बळ,
जशी वासरची गाय, तशी लेकरची माय,
दूर जरी जाते माय, लक्ष बाळाकडे जाय,...
कधी नेसुनि फाटके, ओढ़ी संसारची दोर,
किर्ती तुझ्या काळजाची, सूर्य चंद्रासम थोर...
रूप आईचे साकार, जन्म घेईल उदरात ...
होईल तिचाच मी बाळ, हीच आस अंतरात..

अभिजीत कोळपे
चिंचवड़ पुणे–३३
७३५०००५८१३

प्रेडियाट्रिक होर्मो केअर सेंटरचे उद्घाटन

जळगाव – गोदावरी समूहाचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांच्या शुभहस्ते डॉ.अजिंक्य राजेंद्र पाटील यांच्या प्रेडियाट्रिक होर्मो केअर सेंटरचे उद्घाटन अतिशय थाटात करण्यात आले.

याप्रसंगी गोदावरी समूहाच्या सदस्या डॉ. केतकीताई पाटील, हृदयविकर तज्ञ डॉ.वैभव पाटील, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. राजेंद्र फिरके, डॉ.शुभांगी फिरके, डॉ. सृष्टी पाटील, सौ.आरती पाटील आणि जळगाव मधील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. जळगाव शहरात प्रथमच व एकमेव असलेले बालग्रंथी विकार व वाढ विशेषज्ञ डॉ.अजिंक्य राजेंद्र पाटील यांच्या हॉर्मोकेयर बालरोग एंडोक्राइनोलॉजी केंद्र सुरु झाले आहे.

शहरातील भास्कर मार्केटजवळील गणपती सीटी स्कॅन सेंटरच्या पहिल्या मजल्यावर हे केंद्र असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

आयएमए महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदग्रहण सोहळा

INSTALLATION CEREMONY

जळगाव – आय एम ए महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी डॉ. रावसाहेब कुटे यांची नुकतीच निवड करण्यात आली. दिनांक १९ नोव्हेंबर २०२२ रोजी शिर्डी येथे हा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला.

या सोहळ्यात आ.डॉ.सुधीर तांबे,गोदावरी समूहाच्या सदस्य डॉ.केतकीताई पाटील ह्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. डॉ.रावसाहेब कुटे यांच्या निवडीबद्दल गोदावरी फाउंडेशन कडून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.डॉ. केतकीताई यांनी डॉ. कुटे यांना शुभेच्छा देतांना महाराष्ट्रात आय एम एचे कार्य उकृष्टरित्या सूरू असून डॉ. कुटे यांच्या कालकिर्दीत भरभराट होईल अशी अपेक्षा व्यक्त करतांना त्यांना संपुर्ण राज्याचे सहकार्य राहील तसेच गोदावरी फॉउंडेशन देखिल सर्वोतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन दिले. यावेळी आय एम ए माजी अध्यक्ष डॉ. रवी वानखेडकर, महाराष्ट्रातील नामांकित डॉक्टर्स या सोहळ्यात उपस्थित होते.

तीनदिवसीय महाक्रिटीकॉन कार्यशाळेचा समारोप

जळगाव – दि. १८,१९,२० असे तीन दिवस जळगाव येथे महाक्रिटीकॉन कार्यशाळेचे उदघाटन गोदावरी फॉउंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांचे हस्ते पार पडले.तर शानदार समारोप देखिल करण्यात आला.

या कॉन्फरन्समध्ये ४०० च्या महाराष्ट्रातील नामांकित क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉक्टरांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाचे उद्घाटन हे दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गोदावरी समूहाचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉक्टर उल्हास पाटील यांच्याबरोबर डॉ. राजेश पांडे, डॉ. कपिल झिरपे, डॉ. शैला मैत्रा डॉ. दिघी दिवातीया, डॉ. के डी पाटील, डॉ.राजेश दाबी, डॉ. राहुल महाजन, डॉ.रवींद्र पाटील आणि आयोजक सचिव डॉ.लीना पाटील हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. तिन दिवसाच्या या कॉन्फरन्स मध्ये महाराष्ट्रातील नामांकित विविध डॉक्टरांनी आपले अनुभव विशद केले. दि २० रोजी या कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. यावेळी बोलतांना डॉ. उल्हास पाटील यांनी अशा प्रकारच्या कार्यशाळांमधून अत्याधुनिक तंत्रज्ञान अवगत होते. त्यामूळे अशा कार्यशाळा वारंवार होणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. याच कार्यक्रमातील प्रदर्शनामध्ये डॉ. उल्हास पाटील यांनी भेट देऊन अनेक विषयांची माहिती घेतली.

Mahacriticon Jalgaon, 2022
Theme 'Redefining Critical Care Medicine'
18th - 20th November 2022

डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय रुग्णालयात ओटी निर्जंतूक प्रक्रियेवर कार्यशाळा

जळगाव – डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मुख्य ऑपरेशन थिएटरच्या लॉबीमध्ये 'ओटी निर्जंतुक प्रक्रिया (fogging) व त्यासाठी वापरण्यात येणारे लिक्विड (Disinfectants) कसे वापरावे' यावर शुक्रवार दि.१८ नोव्हेंबर रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

ही कार्यशाळा डिपार्टमेंट ऑफ मायक्रोबायोलॉजी एचआयसीसीअंतर्गत आयोजित केली. एचआयसीसी म्हणजे हॉस्पिटल इन्फेक्शन कंट्रोल कमिटी ही समिती हॉस्पिटलमध्ये विस्थापित होणारे विषाणू जिवाणूंचे संक्रमण व त्यांचा प्रादुर्भाव होण्यास मार्गदर्शन करते. एचआसी समिती ही गेल्या पाच वर्षापासून हॉस्पिटलमध्ये सदैव कार्यरत आहे.

यावेळी मनोज सिंग (Demonstrator) व डॉ.कैलास वाघ (विभागप्रमुख, मायक्रोबायोलॉजी) यांनी उपस्थीत नर्सिंग स्टाफ व ओटी इंचार्ज, डॉक्टर्स व इंर्टन्स यांना मार्गदर्शन केले. ओटी कशी निर्जंतुक करावी ह्याचे प्रात्याक्षिक करुन घेतले.

कार्यशाळा आयोजित करण्यास डॉ.उल्हास पाटील महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. एस. आर्विकर, प्रशासकीय अधिकारी प्रमोद भिरुड यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मायक्रोबायोलॉजी विभागाचे विभागप्रमुख डॉ.कैलास वाघ, सहाय्यक डॉ. प्रशांत गुडेती, मि भवानी वर्मा, मि बिटोपन दास, ओटी मॅनेजर निखील चौधरी, ओटी इंचार्ज दिप्ती राऊत या सर्वांनी परिश्रम घेतले.

रोजगार वार्ता

कोचीन शिपयार्ड ३३० जागा

पदाचे नाव : GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी), **शैक्षणिक पात्रता:** १०वी उत्तीर्ण., **वयाची अट:** ०१ जानेवारी, ०२३ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC:०३ वर्षे सूट, **नोकरी ठिकाण:** संपूर्ण भारत., Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM^2/महिला: फी नाही, Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** ३० नोव्हेंबर २०२२ **परीक्षा** (CBT): जानेवारी २०२३, अधिकृत वेबसाईट: पाहा

संरक्षण संशोधन व विकास संघटनेत १०६१ जागा वयाची अट: ०७ डिसेंबर २०२२ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट १. पद क्र.१ २: ३० वर्षांपर्यंत, २. पद क्र.३ ते ११: १८ ते २७ वर्षे, **नोकरी ठिकाण:** संपूर्ण भारत, Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PWD/ExSM^2/महिला: फी नाही, Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** ०७ डिसेंबर २०२२, **अधिकृत वेबसाईट:** पाहा, Online अर्ज: Apply Online

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल ७८७ जागा

पदाचे नाव तपशील: (कॉन्स्टेबल/ट्रेड्समन), **शैक्षणिक पात्रता,** स्वीपर: १०वी उत्तीर्ण, उर्वरित पदे/ट्रेड: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI उत्तीर्ण, माजी सैनिक: सैन्यात शिपाई / लान्स नाईक किंवा वायुसेना किंवा नेव्हीमधील समकक्ष पद असलेले माजी सैनिक कॉन्स्टेबल / ट्रेडडेमन पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. सुभेदार, एनबी–सुभेदार, हवालदार, नाईक किंवा लष्कर / वायुसेना / नौदल या समकक्ष पदांचा भूतकाळ असलेले माजी सैनिकदेखील पात्रतेच्या निकषांची पूर्तता करुन आणि त्यांच्या लेखी इच्छुकतेची पूर्तता करून खालच्या पदासाठी या पदामध्ये भाग घेऊ शकतात. त्यांची निवड झाल्यास ते संरक्षण दलात असलेल्या पदांच्या बरोबरीच्या पदावर दावा करणार नाहीत, **वयाची अट:** ०१ ऑगस्ट २०२२ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST:05 वर्षे सूट, OBC/ExSM^2: ०३ वर्षे सूट, **नोकरी ठिकाण:** संपूर्ण भारत. Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM^2: **फी नाही,** Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** २० डिसेंबर २०२२, Online AO©: Apply Online.